# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 143/2023 दिनांक : 09.04.2023

## 1)जबरी चोरी :–

**शिवाजीनगर** :–दिनांक 07.04.2023 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **कैलास मेडीकलचे पाठीमागील बोळी जवळ, शिवाजीनगर, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा मा. अशोकराव चव्हाण साहेबांच्या बंगल्यावरून दिवसभराचे कामकाज करून घरी जात असतांना कैलास मेडीकलचे पाठीमागील बोळीजवळ अनोळखी चार ईसमांनी फिर्यादी जवळ आले व संगणमत करून काही एक न बोलता दोघांनी दाबुन धरले व दोघांनी शर्ट पॅन्ट चेक करून पॅन्टच्या डाव्या खिशातील जिवो कंपनीचा मोबाईल किं.अं. 599/–रूपयाचा काढुन घेवुन उजव्या चाळयावर व डोक्यावर बुक्यांनी मारून दुखापत केली व खाली पाडुन लाथाबुक्यांनी मारून जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी देवून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी बालाजी माधवराव साखरे, वय 54 वर्षे, व्यवसाय स्वयंपाक करणे रा. पासायदान अपार्टमेंन्ट शिवाजीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 105/2023 कलम 392,323,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सोनकांबळे, मो.क्रं. 9588685155** हे करीत आहेत.

## 2)वाहन चोरी :–

**भोकर** :– दिनांक 07.04.2023 रोजी 05.15 वा चे सुमारास, **भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादची बुलेरो पिकअप गाडी क्रं. ए.पी./31–टीजी–0004 किंमती 1,00,000/– रूपयाची हि नमुद ठिकाणा वरून कोणी तरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शेख झाकीर अहमद शेख अमीर, वय 40 वर्षे, व्यवसाय चालक रा. मदीना कॉलनी म्हैसा ह.मु. मोहम्मद नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे भोकर** गुरनं 115/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401** जाधव, मो. क्रं. **9850493110** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**भोकर** :– दिनांक 07.04.2023 रोजी 02.00 वा. ते 06.00 वा. चे दरम्यान, **220 के.व्ही. उपकेंद्र, भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील नमुद उप केंद्र भोकर महापारेषण येथील कोणीतरी अज्ञात चोरटयांनी कंपाउंड वाल तोडुन यार्डात प्रवेश करून एकुण 04 नग कॉपर आयसोलेटर ब्लेड चे एकुण वजन 124 किलो किंमती 62,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी आशिषकुमार शं. जीवने, वय 37 वर्षे, व्यवसाय अतिरीक्त कार्यकारी अभियंता 220 के.व्ही. उपकेंद्र भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे भोकर** गुरनं 116/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव, मो. क्रं. 9850493110** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**नायगाव** :– गेल्या पाच वर्षापासुन ते आज पावतो, **संयोगनगर, नायगाव ता. नायगाव जि.** नांदेड **येथे**, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या वडीलांचे नावे असलेला प्लॉट आमचे नावावर कर म्हणुन तसेच चारित्र्यावर संशय घेवून भांडण तंटे करून मारहाण केली तसेच शिवीगाळ करून शारिरीक तसेच माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 35 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 41/2023 कलम 498(अ),323,504 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मुस्तापुरे, मो.क्रं. 9325850996** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**हदगाव** :– दिनांक 08.04.2023 रोजी 11.30 वा. सुमारास, **जी.प.केंद्र प्रा. शाळा हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा आपले वरिष्ठांच्या आदेशान्वे जि.प. शाळेचे बांधकामाचे पाहनी करण्यास गेला असता यातील आरोपीने तेथे येवून शाळेचे बांधकाम बोगस होत असुन ते लपवण्यासाठी व फिर्यादीची वरिष्ठांकडे तक्रार न करण्यासाठी 1,25,000/–रूपयाची मागणी करून फिर्यादी सोबत वाद घालून शिवीगाळ करून शर्टची कॉलर धरून धक्काबुक्की करून शर्ट फाडुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी गुणवंत पुंजाराम काळे, वय 47 वर्षे धंदा नौकरी रा. गौतमनगर, हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 75/2023 कलम 353,384,323, 504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री भोसले, मो.क्रं. 9552591244** हे करीत आहेत.

## 6)ई.सी. ॲक्ट :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 08.04.2023 रोजी 15.15 वा. चे सुमारास, **होमीयोपॅथी कॉलेज हाडको समोर कचरू घोगरे यांचे पत्राचे शेडमध्ये हाडको, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या घरगुती गॅसच्या वापर वाहनामध्ये इंधन म्हणुन गॅस भरण्याचे साहित्य एकुण किंमती 21,000/– रूपयाचे सह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी गजानन माधवराव नांदेडकर, वय 44 वर्षे, व्यवसाय नौकरी मंडळ अधिकारी वसरणी, तहसील कार्यालय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 246/2023 कलम ई.सी. ॲक्ट कमम 3,7 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री घोरबांड, मो.क्रं. 9823333377** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 07.04.2023 रोजी 22.00 वा. ते 22.30 चे दरम्यान, **नविन मोंढा भागात, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक नंगी तलवार घेवून दहशत निर्माण करीत असतांना लोकांच्या निदर्शनास मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकरराव सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 106/2023 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/209 मंगनाळे, मो.क्रं. 8668296883** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 08.04.2023 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **जुना कौठा नांदेड आरोपीचे घराचे पाठीमागे भिंतीच्या कोपऱ्यामध्ये, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी नकली बंदुक ठेवलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2434 प्रमोद गोविंदराव कऱ्हाळे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 245/2023 कलम 6/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भारती, मो.क्रं. 9823333377** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 08.04.2023 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **देगलूर नाका ते वाजेगावकडे जाणारे रोडवरील पाकीजा फंक्शन हॉल समोर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर किंमती 800/–रूपयाचे, दोन तलवार एकुण किंमती 3000/–रूपयाचे, दोन मेटल धातुच्या खऱ्या खुऱ्या अग्निशस्त्रासारखे नकली पिस्टल (लायटर) एकुण किंमती 2000/–रूपयाचे असा एकुण 5800/–रूपयाचा मुद्देमाल घेवून जात असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1138 बालाजी दत्तात्रय तेलंग, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 247/2023 कलम 4/25, 6/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हंबर्डे, मो.क्रं. 9823040224** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड